V.S.P.M. Academy of Higher Education, Nagpur
**Mahatma Gandhi Arts & Commerce College,**
**Parseoni, Dist. Nagpur 441105**
**(NAAC Accredited)**
Website: www.vspmmgcollege.com; Email : principal@vspmmgcollege.com ; Ph. No. 07102-295040 / 9423407638/9422784100

Ref: NAAC 2023/ DVV/Cr-1.3.2 Date-21/12/2023

| Criteria 1.3.2 | **Percentage of students undertaking project work/field work/ internships (Data for the latest completed academic year)** |
|---|---|
| **Findings of DVV** | Provide List of students along with the details of title, place of work, duration etc.. Provide Internship completion certificate / project work completion certificate from the organization where internship / project was completed. Provide Link to report of the field work/ sample photographs of the field work / permission letter only for field work from the competent authority will be considered for 2022-23. |
| **Response/ Clarification** | As per the clarification, as per data template 05 sample scanned copies of project work report & completion certificate and detailed reports of industrial and field visits along with the attendance of students is attached. **(Appendix I)**<br>05 Sample certificates of students internship completion letter from other companies and agencies **(Appendix II)** |

Mahatma Gandhi Arts & Commerce College ★ Parseoni ★ Dist. Nagpur

PRINCIPAL
Mahatma Gandhi Arts
Commerce College,
Parseoni, Dist. Nagpur

Scanned with OKEN Scanner

# Appendix I

1] साहित्यशास्त्र

प्र. साहित्यातील संवेदनात्मकता कशी असते ते स्पष्ट करा.

उत्तर :- साहित्याचा विचार करताना साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवांचे विशेष समजून घ्यावे लागतात. साहित्यात व्यक्त होणारे अनुभव वास्तवाला कल्पनेची जोड देऊन ते भावव्यंजक केले जातात. साहित्याची निर्मिती आणि साहित्यिकाच्या मनाविश्वाशी संबंधीत असते तर दुसरीकडे ही निर्मिती वाचकाच्याही मनोविश्वाशी संबंध राखणारी असते. साहित्यकृतीच्या स्वतंत्र विश्वनिर्मितीला कारणीभूत असणारा साहित्यातील महत्वाचा घटक म्हणजे साहित्यातील संवेदनात्मकता होय.

साहित्य निर्मिती होताना 'शब्दमाध्यम' हे एकमेव असे माध्यम असते, ज्याद्वारे साहित्यात हे कलात्मक पातळीवर आलं असते कारण पंचेंद्रियांना जाणवणारा अनुभव संवेदनांच्या आधारेच वाचकापर्यंत पोहचत असतो. 'हिरवे हिरवे गार गालिचे । हरीत तृणाच्या मखमालीचे' किंवा 'फिकट निळीने रंगविलेल्या कापूस मेघांच्या' यातील रचना पाहिल्या म्हणजे रंगसंवेदनांच्या आश्लेषकतेचे स्वरूप स्पष्ट होते.

कोणतीही कलाकृती घ्या. (आरतीची 'गारंबीचा बापू', 'झाडाझडती', 'काश्मिरी गुलाब' या कादंबऱ्या किंवा बालकवींची 'श्रावणमास', 'अरुण', 'फुलराणी' या कविता वाचल्या म्हणजे शब्दांच्याच माध्यमातून एक दृकप्रत्यय देणारा जीवनानुभव आविष्कृत होत असतो.

चित्रकलेत रंग-रेषांच्या माध्यमातून 'फुलराणी' रंगवता येते, पण बालकवींच्या फुलराणीतून शब्दमाध्यमातून दृकप्रत्यय आपल्याला मिळतो. 'मखमाली' शब्दातून 'स्पर्श' संवेदना कळते 'डमडमत डमरू ये, खणखणत शूल ये, शंख फुंकीत ये येई रुद्र!' या काव्यपंक्तीमधून नादानुभव रसिकांना मिळतो. साहित्यातील संवेदना अशा पंचविध स्वरूपाच्या असतात आणि शब्दाच्या माध्यमातून त्याची अभिव्यक्ती होत असते.

वास्तविक पंचसंवेदनांची अभिव्यक्ती सर्व कला आपापल्या परीने करीत असतात. पण प्रत्येक कलामाध्यमाच्या काही मर्यादा असतात. संगीत, चित्र, नृत्य, नाट्य, शिल्प या कला 'साहित्य' कलेसारख्याच कला आहेत. परंतू संवेदनांच्या अभिव्यक्तीबाबत साहित्यकलेचे सामर्थ्य जास्त आहे.

गंध, रूप, नाद, स्पर्श, रस या संवेदनांपैकी रूप, स्पर्श व नाद या संवेदना महत्त्वाच्या आहेत. नृत्य-नाट्याशी - रूप + नाद संवेदना महत्त्वाच्या असतात. चित्रकलेच्या संदर्भात रूप तर शिल्प-स्थापत्य कलांच्या संदर्भात रूप+स्पर्श संवेदना महत्त्वाच्या ठरतात. मात्र रस+गंध संवेदनांचा या कलांशी संबंध नसतो. चित्रकलेत रंग+रूप संवेदना असतात. या पार्श्वभूमीवर साहित्यकलेचे वेगळेपण खास जाणवते. संवेदनांची विविधता जशी साहित्यात आढळते तशी कदाचित अन्यत्र आढळत नाही. संगीतासारखी कला तर केवळ नाद संवेदनांवरच अवलंबून असते. सुरांची निर्मिती आणि श्रवण एवढाच आधार संगीत कलेचे

(निर्मिता आणि रसिक) आनंद घेऊ शकतो. कुठल्याही याला संगीताला महत्त्व नसते. चित्रकला, दृकसंवेदना व रंगसंवेदनेचा प्रत्यय आपल्याला मिळत असतो. नृत्यात शरीर हालचालीची महत्त्वाच्या, चित्रात वजन आणि हलता महत्त्वाची असते. संगीत, चित्रकला या सारख्या कलांच्या एकाच एका प्रकारच्या संवेदनांवर भर असतो. मुख्य मुद्दा 'कला आणि मानव' या ग्रंथात स्पष्ट केला आहे. कोणत्याही कलेचा आस्वाद रसिक 'देहाचे कान' करूनच घेत असतो.

आपण एखाद्या कलेचा आस्वाद घेतो तो इंद्रियामार्फत. सर्व शक्ती एकवटूनच आपण हा आनंद घेतो असे पु.शी. रेगे (छांदसी पृ.१५८) यांनी म्हटले आहे. इतर कलांमध्ये मर्यादीत संवेदनांची अभिव्यक्ती होत असते. तर साहित्यिक कोणतेही सर्वच संवेदनांना आविष्कृत करता येते पंचेंद्रियांच्या संवेदनामार्फत साहित्यकृतीतील अनुभव रसिकमनाला उल्हसित करीत असतात. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात शब्दांच्या माध्यमातूनच हे सारे आवाहन पंचेंद्रियांना कसे असते ते सांगताना सुंदर वर्णन केले आहे. कदाचित संवेदनांचे इतके सुंदर व काव्यमय वर्णन क्वचितच कोणी केले असावे.

जैसे कोवळिकेचेनि पाडें । दिसती नादींचे रंग थोडे ।
वेधे परिमळाचे बिक मोडे । जयाचेनि ॥१५॥
ऐका रसाळपणाचिया लोभा । की श्रवणींचि होती जिभा ।
बोले इंद्रियां लागे कळंभा । एकमेकां ॥१६॥
सहजे शब्दु तरी विषो श्रवणाचा । परि रसना म्हणे हा रसु आमुचा ।
घ्राणासि भावो जाय परिमळाचा । हा तोचि होईल ॥१७॥
नवल बोलतीये रेखेची वाहणी । देखता डोळ्याहि पुरों लागे धणी ।
ते म्हणती उघडली खाणी । रुपाची हे ॥१८॥

एकंदरीत 'शब्द' हा रसनेला आपला विषय वाटतो. घ्राणेंद्रियांना त्यातून प्रगटणारा शब्दांच्या परिमळ जाणवतो. शब्दांच्या रेखीव मांडणी पाहून डोळे तृप्त होतात. आणि त्यातून व्यक्त होणाऱ्या आशयाला कवेत घेण्यासाठी हात अधीर होतात. अशा तऱ्हेने प्रत्येक इंद्रियाला 'शब्द' हा आपला विषय वाटतो आणि पंचेंद्रियामध्ये तो 'कळंभा' म्हणजे भांडण लावतो हे वर्णन अलंकारीत असले तरी साहित्यातील संवेदनांवर प्रकाश टाकणारे आहे.

संगीतातील सूर कानावर प्रत्यक्षात ऐकू येतात. तर किंबहुना साहित्यातील शब्दांचा नाद हा पुढच्या मनाच्या पातळीवर ऐकू येत असतो.

संगीतातील संवेदना संवेदनातील आनंद देणाऱ्या कला असतात. चित्रातील आनंदाचा संबंध त्यांच्या रंगरेषांशी असतो. साहित्यातील शब्दांनी भावानुभवांच्या संवेदनात्मक प्रत्यय द्यायचा असतो. पिकले पान पाहून तसेच रंगवणे हे चित्रकाराचे कार्य, तर पिवळ्या पानाला पाहून वृद्धावस्था किंवा अन्य गोष्टी सुचित होणे महत्वाचे असते. पिवळे पान पाहून मनात विचार कल्लोळ उठणे ही बाब महत्वाची असते. शब्दांनी केवळ संवेदना जाणीव होत नाही तर विविध भाववृत्तींना जागे करण्याचे कार्य यातून घडत असते.

अशाप्रकारे साहित्यातील संवेदनांचे विश्व आणि त्याचे कार्य इतर संगीत, चित्रकलांहून वेगळे असते. वास्तवाचे सौंदर्य संवेदनांच्या पातळीवर चित्रण करताना पंचसंवेदनाची भावानुभूती साहित्यात अपेक्षित असते आणि हेच खऱ्या अर्थाने मात्र भावयत्री प्रतिभा आवश्यक असते.

→ मराठी गद्य

१. म्हाइंभटांच्या कार्य-कर्तृत्वाचा आढावा घ्या.

उत्तर:- म्हाइंभट हे गोविंदप्रभुचरित्राचे संकलक आहेत. 'लीळाचरित्राची' निर्मितीही त्यांनी केली. हे सर्वश्रुत आहे. 'इतिहासप्रकरण' या ग्रंथात 'लीळाचरित्र: पूर्वार्ध-उत्तरार्ध' हे म्हाइंभटांच्या नावावर आहेत. ओंकाराने गुंफलेल्या वृद्धाचारात 'उत्तरार्ध पूर्वार्ध: शोधुनिया लीळा: लावीली शाखा: दोन्ही रूपा ।।ऐसा म्हाइदेवो" असा उल्लेख आहे तर लोणारकरांच्या 'अन्वयस्थळ' त "आणि तिन्ही रूपे चरित्रे म्हाइंभटी केली" असा उल्लेख आढळतो. 'म्हाइंभट दास्या होउ घाली' या स्फुटीस्थळातील उल्लेखावरूनही म्हाइंभट आणि गोविंदप्रभुंचा संबंध खूप जवळचा होता हे स्पष्ट होते. नागदेवांनी म्हाइंभटाला आपण करीत असलेल्या चिंतनाचे कारण सांगताना 'ऐसीची चरित्रे आठविजेति: आइकिजेति: उच्चारिजेति: तेही एक स्मरणचि कीं गा:" हे कारण सांगितले, असा इतिहासप्रकरणात उल्लेख आहे. नागदेवांच्या सांगण्यावरूनच "जैसा लीळा वर्तलिया तैसा जेयाचिया अनुभवीचीया तयाते पुसाविया:" या लीळा म्हाइंभटांनी एकत्र केल्या. अशा म्हाइंभटांचे कर्तृत्व थोरच म्हणावे लागेल. कारण नागदेवाचार्य ज्या चक्रधरांच्या लीळांचे स्मरण करीत, त्या भक्तासाठी तेही त्यांची उपयुक्तता म्हाइंभटांच्या लक्षात आली.

गोविंदप्रभुचरित्राच्या निर्मितीत म्हाइंभटांनी लीळाचरित्रात वापरलेली पद्धतच उपयोगात आणली. त्या म्हाइंभटांचे जीवन व कार्य-कर्तृत्व थोडक्यात पाहिले पाहिजे.

म्हाइंभट हा सराळे गावाचा राहणारा होता त्याची पत्नी देमाइसा 'गणपती आपयो' या विद्वान

ब्राम्हण पंडीताजवळ त्याने अध्ययन केले. 'प्रभाकर' खरसे केलेला दर्शन तो शिकला. तो अहंकारी झाला. पायात लुगाची वाको व दिवसा आपल्यासमोर दिवटी लावून स्वतःला ज्ञानी समजू लागला. इतर पंडीत तुणा-च्या वाकोसारखे आणि सूर्यही आपल्यासमोर निस्प्रभ आहे असे त्याला वाटू लागले. पिंपळे वामन भटाबरोबर म्हाइंभट डोंबेग्रामी गेले. तेथे चक्रधराला ते भेटले. गर्वा-मुळे चक्रधराला साष्टांग प्रणिपात न करता त्याने केवळ 'कायाप्रणाम' केला. श्रीचक्रधरांशी झालेल्या चर्चेत म्हाइंभट पराभूत झाला व त्याने श्रीचक्रधरांचे शिष्यत्व स्वीकारण्याचा विचार केला. परंतू श्रीचक्रधरांनी त्याला गोविंदप्रभुकडे जाण्याचे सुचविले. तो रिद्धपूरला आला.

म्हाइंभटाला ज्ञानी असल्याचा गर्व श्रीचक्रधरांनी हरण केला तर गोविंदप्रभुंनी त्याचा सेवादाऱ्याचा गर्व हरण केला. तरी तो इतरांना तुच्छ लेखायचा. नागदेवांना तो याच कारणाने सुंडदेव म्हणाय-चा. पण चक्रधरांनीच नागदेवाचे मोठेपण मान्य केल्या-वर तो नागदेवांना नमस्कार करू लागला. त्याची पत्नी देमाइसामुळे म्हाइंभटानी कोथळोबावर तसेच महदाइसेवर आरोप घेतला, पण देमाइसेचे हे कारस्थान महदाइसेने उघडकीस आणले.

म्हाइंभट हा नागदेवाचार्यांचा सेवक होता. "म्हाइंभटाने श्री प्रभुदाऱ्यावेगळे जो दाखवी तयासी मी महावाक्य वाखाणीन्" (स्मृती २८६) असे नागदे-वाचार्यांनी एकदा म्हटले होते. गोविंदप्रभुच्या मृत्युनंतर खांदा देणाऱ्यात म्हाइंभट एक प्रमुख होता. तोच शास्त्राधिकारामुळे संस्कृतातून वाद घालायचा (लीळा२६०,२१० पहा

म्हाइंभटाचे ग्रंथकार म्हणून फार महत्त्व आहे. संस्कृतज्ञ असूनही त्याने बहुतेक रचना मराठीतूनच केलेली आहे. त्याला आद्यचरित्रकार म्हणता येईल त्याने लिहीलेले ग्रंथ म्हणजे लीळास्वरुप आहेत. पण ते संकलनात्मक वाटले तरी त्याने गोळा केलेल्या लीळा अन्वयी लावल्या, त्याची पारिणामकतुल्यथा सुबद्ध मांडणी केली. या चरित्रलेखनासाठी त्याने अपार परिश्रम घेतले. " खेइभट कृती करावेया जाति..... आणी म्हाइंभट तेया मागां मागां गोसावियांचिया लीळा पुसति :" (स्मृती१४०) चरित्र संशोधनाची त्यांची तळमळ यातून दिसून येते. या ग्रंथातून भाषा, व्याकरण व वाङ्मय यावरच नव्हे तर इतिहास, धर्म, समाज इत्यादीवर प्रकाश पडतो.

महदंबेच्या 'धवळ्यां'च्या उत्तरार्धाची रचना म्हाइंभट व लक्ष्मीधर भट यांनी केली. 'अन्वयस्थळा'च्या अनेक पोथ्यातून धवळ्यांच्या उत्तरार्ध म्हाइंभटाच्या नावावर नोंदविलेला आहे. हरिताप-सोंगोबास यांच्या 'अन्वयस्थळा'त धवळ्याचा उत्तरार्ध म्हाइंभटानेच लिहीला हे नमूद केलेले आहे.

धवळ्याप्रमाणेच 'चरणशरणपार' इत्यादी पाच श्लोक व दहा मराठी आरत्या 'जातिचा दशकु" म्हणून महानुभावीयात प्रसिद्ध आहेत. म्हाइभटानी आपल्या आयुष्याच्या शेवटचे दिवस श्टणाविजणात घालविले. आयुष्याच्या अखेरीस, 'उमाई, मला रिद्धपुरला घेवून चला' असे म्हणाले. तेव्हा आपले मुली गहाण टाकून भाड्याच्या पालखीतून रिद्धपुरला आणले. तेव्हा नागदेवाचार्य आगमात

होते. तेव्हा म्हाइंभट गहीवरून म्हणाले, "भटो, निळावीरे पावो देवा." पण 'तो अधिकार आपला नसून गोविंदप्रभूंचा' असल्याने नागदेव म्हणाले. मग नागदेवांनी म्हाइंभटांच्या कपाळावर हात ठेवला. अखेरच्या क्षणी म्हाइंभट नागदेवाला म्हणाले, "भटो! मज देवा होइल?" "मी फार पापी आहे, मला कुठला देव होणार!" त्यावर नागदेवाचार्य म्हणाले, "म्हाइंभटो! तुम्हासी दोन्ही देवांचे सानिध्याल दास्य." तुम्हाला देव होणार नाही तर कोणाला?.. या बोलण्याचे म्हाइंभटांना समाधान वाटले.

आपल्या अपराधाची सर्वांनी क्षमा करावी व मृत्युनंतर श्री गोविंदप्रभुजवळ आपल्याला पुरावे ही आकांक्षा त्यांनी व्यक्त केली. असे हे म्हाइंभटाचे जीवन आणि कार्य. जीवनाची इतिकर्तव्यता झाल्याचे नागदेवांनी म्हटल्यावरच त्यांचे समाधान झाले. म्हाइंभट नसते तर महानुभाव पंथाच्या या दोन कृष्णांच्या वाङ्मयमूर्ती (चरित्रे) आपल्याला उपलब्ध झाल्या नसत्या यात संशय नाही.

⇒ अर्वाचीन कविता

१७. बालकवींच्या कवितामधून काही वैशिष्ट्य घटकांच्या आढळ दिसून येतो, स्पष्ट करा.

उत्तर :- बालकवींच्या कवितेमध्ये निर्झर, भ्रमर, पक्षी, तारका, तरुवर इ. काही घटक वारंवार येऊन आपले लक्ष वेधतात. त्यांचे स्वरूपही सर्वत्र सारखे नसते तर भाववृत्तीप्रमाणे ते बदलत असते. 'आनंदी-आनंद' ह्या कवितेमधील निर्झर हा मंदगतीने वाहतो. 'निर्झरास' मधील निर्झर हा कड्यांवरून उड्या घेत, फुगड्या खेळत, लपत छपत, वळसे घेत हिरवाळीतून वाहतो. 'बाल-विहग' मधील हा वाहता निर्झर बालविहगाकडे बघून समाहित झाल्यासारखा शांत होतो. "औदुंबर" मधील निळा सावळा झरा हा दोन्ही तटांवरील हिरवळी घेऊन वाहणारा आहे. तर 'वीर मराठा' मधील निर्झर धो धो वाहतो.

बालकवींच्या निसर्गकाव्यामध्ये येणारे पक्षी आणि भ्रमर हे दोघेही मधुर गाणी गाणारे आहेत. कोकिळ आणि भारद्वाज यांना तर 'मंगल गाणी तका मोहूनी जगताच्या चित्ता' असे आवाहन बालकवी करतात. 'फुलराणी' मधील कोकिळ तर तानांवर ताना घेतो आणि भारद्वाज नाचू लागतो. गोड गळ्याचा पंडित फुलराणीच्या वाड:निश्चय करायला निघतो. 'आनंदी पक्षी' आनंदाच्या सृष्टीमध्ये मुक्तपणे विहरतो 'बाल-विहगा' त्या

लेखून तर बालकवी-

झाले माझे वातावरणी कुजपारे भरभरती
पंख फुटुनिया विव्हल पडलो मी धरणीवरती

अशाप्रकारची खंत व्यक्त करतात. 'आम्हाकरीता कुढर चिंता' 'नाना दुःखे हाल खमोंला' याची त्यांना जाणीव होते. आणि पक्षी व आपले विश्व हे कोवळे आहे असा अनुभव त्यांना येतो आणि मग तानावर ताना घेणाऱ्या कोकिळांची जागा गिरिकुहरात रडणाऱ्या कोकिळा घेतात; काटेरी झुडुपात बसून गाणाऱ्या पाखरांचे संवादचूऱ्य असे 'हुं-हुं-हुं' चे गोल करतरी वाहत राहते. 'पारवा' 'खिन्न नीरस एकांतगीत' गात बसतो.

बालकवींच्या ह्या काव्यविश्वामध्ये तारका ह्या बऱ्याचदा लहान मुलींचे रूप घेवून प्रवेशतात. त्यांच्या परस्परांमध्ये सख्यभाव असतो. पुढे त्या प्रेमाचा फेर धरून गाता गाता प्रौढ होत जातात. चंद्र हा त्यांचा सखा बनून त्यांना भेटायला येतो. त्यांच्याबरोबर ह्या प्रेमसंगमात पोहतात. 'फुलराणी' आणि 'तारकांचे गाणे' मध्ये त्या प्रणयक्रीडा करताना आढळतात. त्या प्रेमाचे शेत पेरतात आणि प्रेमाची गाणी गातात. 'जिकडे-तिकडे गोणचे गाणे' मध्ये त्या चंद्राबरोबर रास खेळतात. कधी चंद्रसुद्धा बालसुधाकर बनून बालशिरावर बालकरांचा अभिषेक करतो. शुक्र तर सौंदर्याचे केंद्र बनतो. अशा ह्या तारका अंधाऱ्या रात्रींना उजळीत ह्या विश्वात प्रकटतात. त्यामुळे बालकवींचे काव्यविश्वसुद्धा

उमलले. बालकवींच्या आरंभीच्या काळातील काव्यविश्वात फुलणारी फुले, डोलणारी झाडे, नाचणाऱ्या वेली, गाणारी पिवळी शेते, हिरवी कुरणे यांची गर्दी झालेली दिसते. तेथे कमळे फुलतात, फुलांचा थाट असतो, फुलराणीचे लग्न लागते. संध्यातारक फुलांच्या रूपात उगवतो आणि नभातारेसुद्धा फुलवतो. बगळ्यांच्या माळा कल्पकुसुमांच्या माळा बनतात. बालविहग गिरिशिखरांचे फुल बनून संध्यातरंगावर झुलत राहतो, सुंदरतासुद्धा सुमनरूप धारण करते तृणपुष्पाला कवितेच्या उद्यानात स्थान मिळते, गगनाला मोहोर येतो, ब्रम्हांडाची सदाफुली फुलते, कवी फुलाहून नाजूक बनतो आणि सुमकोशाचे शरपंजर करून त्यातच सारखे होण्याची आकांक्षा बाळगतो.

बालकवींच्या कवितांमध्ये प्रामुख्याने निसर्गकवितांमध्ये निर्झर, पक्षी, तारका ह्यांच्याप्रमाणे हिरवळीचे दर्शनसुद्धा आपल्याला जागोजाग होते. 'फुलराणी' मध्येही फुलराणी हिरव्यागार हरित तृणांच्या मखमालीवर खेळते आहे, तर 'औदुंबर' मधील निळासावळा झरा आपल्या दोन्ही कांठावरील हिरवळीला होवून चालला आहे, तर 'श्रावणमासा' मध्ये चिकडेतिकडे हिरवळ दाटलेली आहे.

निसर्गकवितांमधून बालकवींनी प्रियकर-प्रेयसींच्या काही जोड्या निर्माण केलेल्या आहे उदा० दिवस आणि यामिनी, चंद्र आणि चंद्रीका

चंद्र आणि तारका, फुलराणी आणि स्वीकर सुर्य आणि पाश्चिम दिशा इ. आणि हे सर्व प्रेमाची उधळण करताना आपल्याला वारंवार भेटतात.

## => नाटक

प्र.१. खाडिलकरांच्या नाटकांच्या भाषाशैलीचे वैशिष्ट्ये सांगा.

उत्तर :- प्रत्येक लेखकाच्या भाषाशैलीची काही वैशिष्ट्ये असतात तशी ती नाट्याचार्य खाडिलकरांच्या भाषाशैलीचीही आहेत. त्यांची भाषा अलंकृत नाही नटवी नाही. शब्दसौष्ठव व कोटिप्रधानता हे तिचे विशेष नाही केळकरांना ती खटकतात व विलक्षण वाटले. कोल्हटकर व गडकरी ह्यांच्या नाटकांतील भाषेशी तुलना केली असता तिचे हे अनलंकृत स्वरूप विशेषत्वाने जाणवते. परंतु असे असूनही ह्या भाषेत अनेक पौराणिक व ऐतिहासिक स्त्री-पुरुषांच्या जीवननाट्याचे त्यांनी दर्शन घडविले. मराठी प्रेक्षक ह्या दर्शनाने थरारून गेले. खाडिलकरांच्या नाटकांची भाषा ही ज्या विचारनाट्याचे आपणास अनेकदा दर्शन घडविले ते विचारनाट्य असत आहे. ते आगंतुक, ठिगळवजा, प्रदर्शनात्मक नाही. पात्रांच्या स्वभावविशेषातून विशिष्ट प्रसंगांच्या संदर्भात ते सहजपणे प्रगट होते. खाडिलकरांची पात्रे स्वतःची भाषा बोलतात.

खाडिलकरांच्या भाषेत जोरकसपणा आहे. तिच्यात ओजोगुण आहे. केळकरांच्या मते, "खाडिलकरांच्या शृंगार हा सुद्धा नुसता शृंगार नसतो. त्यांच्या मनोधर्मानुसार त्यांच्या नाटकांतील प्रणय भावना देखील ओजस्वी रूप धारण करून प्रकट होते." ओजोगुण हा खाडिलकरांच्या रोकठोकपणाचा आणि म्हणूनच लेखनप्रकृतीचा प्रमुख गुण-

असल्यामुळे तो त्यांच्या स्वभावचित्रणात, प्रसंगशोधनात आणि ह्या सर्वांतून प्रकट होणाऱ्या विचारांत त्यात सर्वत्र भरलेला आहे. म्हणूनच तो त्यांच्या नाटकांतील भाषेतही सर्वत्र दिसून येतो. ही भाषा अनलंकृत असूनही अत्यंत जोरकस व नाट्यपूर्ण वाटते ती ह्यामुळेच.

खाडिलकरांच्या नाट्याच्या प्रकृतीसंबंधीची समज बरीचशी पक्की असल्यामुळे त्यांच्या नाटकांतील संभाषणे वाजवीपेक्षा अधिक लांबत नाहीत आणि लांबलचक भाषणे कंटाळवाणी वाटत नाहीत. खाडिलकर संवादासाठी जी भाषा वापरतात तिची झाटणी बरीचशी बोलीभाषेची असते. उदा. सौदामिनी म्हणते, "वा! वा! जा तू आपल्या कामाला, तुझ्या तोंडाला पुष्कळ पाणी सुटलं, पण मी ऐकायला पाहिजे ना! (मंदहासेनी बोलते) स्वस्थ गडे सैरंध्री, ही मंदहासेनी बलकी कुरूप असताना पुरुषांच्या पुढेपुढे करावेसे हिला वाटते तरीकसे? लंगडे ते लंगडे आणि गावदरीला चरेना!" म्हणूनच लिखाणात कोणत्या शब्दावर किती जोर ह्यावयाच्या ह्याकडे विशेष लक्ष दिले गेले असल्याचे आढळून येते. त्यांची जी वाक्ये रचनादृष्ट्या सदोष किंवा बोजड वाटतात, तीच वाक्ये रंगभूमीवर ऐकताना ठसकेदार आणि भेदक वाटतात.

खाडिलकरांच्या स्वभावातील मितभाषीपणा नेही त्यांच्या वाणीतील सामर्थ्य येण्यास मदत केली आहे. टिळकांचे हे अनन्य भक्त. त्यांच्याप्रमाणेच वाचकांकडे एक साधन ह्या दृष्टीने पाहतात.

तिच्यात लालित्य आणण्याची, तिला समजवण्या-नटवण्याची, मुलमहूर आणि चमकदार बनविण्याची कुठीही प्रयत्न करीत नाहीत. म्हणूनच तिच्यात सरळत्व येते. एक प्रकारचा भेदकपणा येतो. मर्मावर नेमके बोट ठेवण्याची ताकद येते. खऱ्या अर्थाने पौरुष येते.

परंतु खांडेकरांच्या भाषेत खऱ्या अर्थाने पौरुषाचा साक्षात्कार होण्याचे मुख्य कारण म्हणजे तिची अंगभूत वैचारिकता होय. विचार हे गद्याचे भूषण आहे. मग त्याचे स्वरूप कोणतेही असो. खांडेकरांचे हे गद्य विविध भूमिकांचे नाट्य प्रकट करू पाहणारे गद्य आहे. ह्या विविध भूमिकांच्या संघर्षातून प्रकट होणारे अनुभवनाट्य व्यक्त करणारे ते गद्य आहे. तेव्हा ते भावगर्भ आहे. ते भावगर्भ असल्यामुळे त्यात अभिनिवेश व प्रत्ययकारित्व अवतरत असले तर ते विचारगर्भ असल्यामुळे त्यात वजनदारपणा, अर्थवत्ता अवतरते. ज्या प्रमाणात ही विचारगर्भता नाटकात प्रसंगपरत्वे व पात्रपरत्वे ज्याप्रमाणे वाढत जाते, त्या प्रमाणात वरील गुणांचा प्रत्यय त्यातून अधिकच येत जातो. अशावेळी त्यातील ओजोगुण आपणास विशेष जाणवतो. खांडेकरांच्या भाषेतून जाणवणारे पौरुष हे ह्याप्रमाणे त्यांच्या विचारांच्या जोरकसपणाशी संलग्न आहे. खांडेकर हे केवळ विचारमंथन करीत बसत नाहीत, तर विचारमंथनातून जे आचारसंबंधीची तत्त्वे हाती लागत असतात, त्या अभिनिवेशाने व्यक्त करतात. हा तत्त्वशोध, ही तत्त्वनिष्ठा हा तत्संबंधी आग्रह. ही श्रद्धा त्यांच्या वाणीत एक

आगळे सामर्थ्य निर्माण करते.

प्रकल्पाचे नाव :- स्थानिक पर्यावरणासंबंधी माहिती.

मुद्दे :-

* नगराचे किंवा गावाचे नाव, तालुका व जिल्ह्याचे नाव.
* लोकसंख्येसंबंधी माहिती.
* शेतीसंबंधी माहिती.
* नदी, पर्वत, जंगल आहे का ?
* औद्योगिक क्षेत्र आहे का ?
* कशाचे उत्पादन होते. स्थापना.
* गावात प्रदूषण आहे का ?
* वृक्षांची लागवड केली आहे का ?
* प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना केली आहे का, नाल्या बंदिस्त आहे का, फवारणी केली जाते का?

Pioneer ™

स्थानिक पर्यावरणासंबंधी माहिती गोळा करण्यासाठी निवडलेल्या गावाचे नाव :-

गाव :- गडेगांव
तालुका :- सावनेर
पोस्ट :- खानगांव
जिल्हा :- नागपूर

Max. Retail Price Rs.2/- Including all taxes

Page : 05
Date : 17/3/017

Topic

## प्रस्तावना

मी प्रकल्पकर्ता "कु. शुभांगी लक्ष्मणराव बोदिरे", "महात्मा गांधी कला, वाणिज्य महाविद्यालय पुरकावली", येथील वर्ग बी.ए. द्वितीय वर्ष कला मध्ये शिकत आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सातत्यपूर्ण अंतर्गत मूल्यमापन पद्धतीनुसार २५ गुणांच्या अंतर्गत मूल्यमापना साठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी एक प्रकल्प तयार करावयाचा असतो. त्यामुळे सत्र २०१६-१७ मध्ये पर्यावरण "श्री. ओंबाव सर" यांच्याकडून विषय :- "स्थानिक पर्यावरणासंबंधी माहिती लिहा." हा विषय देण्यात आलेला आहे.

" सामाजिक पर्यावरणात केलेली मनपूर्वक हेतू वा उपक्रम म्हणजे प्रकल्प होय.

या प्रकल्पाची प्रस्तावना, हेतू, व उद्देश, महत्त्व, गृहीते, अभ्यास पद्धती, आलेख लेखन माहितीचे विश्लेषण, निष्कर्ष, आवश्यकता, संदर्भसूची करून अभ्यास यांविषयी माहिती सरांकडून व कामिनींच्या मदतीने गावाची माहिती प्राप्त झाली. या प्रकल्पाच्या माध्यमातून समाजाच्या साक्षरता, निरक्षरता, दर कुटुंबातील समाधान, लोकसंख्येची माहिती, शेतीची माहिती, उत्पन्नाची सहकार्याविषयक, व्यवसायाविषयी, व प्रकल्पाची

माहिती उपलब्ध करून देणे हा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे.

या प्रकल्पाच्या माध्यमातून स्थानिक पक्षिकांसंबंधी माहिती मिळावी. हा नाविन्यपूर्ण प्रकल्प मला निवडावा असा वाटला. हा प्रकल्प करण्यासाठी मी सतत १ सप्ताह मी माझ्या प्रकल्पाची माहिती विषयक वर्तमान पत्र, साप्ताहिके, दूरवाणि, यातून माहिती गोळा केली. तसेच पर्यावरण विषयाची पुस्तके यातूनही गोळा केली.

Topic

## हेतू व माहिती

1] नगराचे किंवा गावाचे नाव :-

मी हा प्रकल्प करण्यासाठी गडेगांव या गावाची निवड केली आहे. हे गाव सावनेर तालुक्यात व नागपूर जिल्ह्यात आहे. सावनेर तालुक्यापासून गडेगांव हे गाव दक्षिणेस आहे. सावनेर पासून 6 किलोमीटर इतके अंतर आहे.

2] गावातील लोकसंख्येसंबंधी माहिती :-

"विशिष्ट वेळी भूपृष्ठाच्या प्रदेशात असलेली लोकांची एकूण संख्या म्हणजे त्या प्रदेशाची लोकसंख्या होय."

3] वयोगटानुसार रचना :-

1] १४ वर्षाखालील वयोगट :-

या वयोगटामध्ये मुख्यत्वे बालकांचा समावेश होतो. हा वयोगट अनुत्पादक असल्यामुळे परावलंबी असतो. त्यांचा पालनपोषणाचा व शिक्षणाचा भार पालकांना उचलावा लागतो

गडेगांव या गावात १४ वर्षाखालील मुलांची संख्या ३२५ इतकी आहे

२] १५ वर्षे ते ५९ वर्षाचा वयोगट :-

या वयोगटामध्ये सुरुवाती बालकांचा तरुण व प्रौढ व्यक्तींचा समावेश होतो. हा वयोगट कार्यकारी तसेच उत्पादक असतो. या वयोगटातून समुदायाचे मनुष्यबळ पुरवठा होतो.

गडेगांव या गावातील या वयोगटात मोडणाऱ्या लोकांची लोकसंख्या (६६५) ६७५ इतकी आहे.

३] ६० वर्षे व त्यापेक्षा जास्त वयोगट :-

या वयोगटामध्ये सुरुवाती वृद्ध व्यक्तींचा समावेश होतो. या वयोगटातील बहुतेक व्यक्ती अनुत्पादक असतात. परंतु त्यांचा अनुभवांचा फायदा इतर घटकांना होतो.

गडेगांव या गावातील या वयोगटात मोडणाऱ्या लोकांची संख्या ३०० इतकी आहे.

या गावातील एकूण लोकसंख्या १९०० इतकी आहे.

Max. Retail Price Rs 2/- Including all taxes

Page : 08

Topic

# शेतीसंबंधी माहिती :-

① शेती :-

गडेगांव या गावात शेती व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो या गावातील ९९% लोक शेती हा व्यवसाय करतात शेतीसाठी लागणारा पाणीपुरवठा विहिरी, नद्यांचे पाणी व ओढा यातून होत असल्यामुळे शेती व्यवसाय जास्त व मोठ्या प्रमाणात केला जातो. वर्षातून दोन किंवा तीन पिके घेतली जातात. मका, गहू, ज्वारी, चना, तूर, ऊस, कापूस त्याच सोबत वांगी, कांदे, टोमॅटो इ. पिके सुद्धा घेतली जातात.

या भागात (काळी) रेगुर मृदा असल्यामुळे कापूस हे शेतीत महत्त्वाचे पीक आहे. जलसिंचन, खते, किटकनाशके यांच्या वापर केल्यामुळे शेतीतून भरपूर उत्पन्न मिळते. या गावातील लोक शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन हा व्यवसाय करतात.

② वनस्पती :-

या गावात बाभूळ, लिंब, निंब, बोर, पळस, आपटा हे वृक्ष मोठ्या प्रमाणात आढळतात.

ii) पशुपालन :-

या गावातील लोकांचा शेती-बरोबर जोडधंदा म्हणून पशुपालन हा व्यवसाय आहे.

या गावात शेती भरपूर प्रमाणात असल्यामुळे गुरांना चरण्यासाठी चारा मोठ्या प्रमाणात असतो. त्यामुळे येथे गाय, बैल, म्हैस, कोंबड्या, बकरी इ. प्राणी पाळले जातात. गाईच्या दुधापासून तूप, लोणी, दही, पनीर, इ. पदार्थ बनविले जातात. त्यांची बाजारात विक्री केली जाते. या सर्व गोष्टी मानव त्यांच्या रोजच्या आवश्यकतेसाठी करित असतो.

अशाप्रकारे या गावातील लोक पशुपालन व्यवसाय करतात.

Topic

* गावातील लोकांचे लोकजीवन :-

या गावात हिंदू धर्माचे लोक मोठ्या प्रमाणात आहेत. या गावातील लोकांची बोलीभाषा मराठी ही आहे. येथील लोक आधुनिक पद्धतीचा पोशाख घालतात. कोट शर्ट, पॅन्ट, धोतर, साडी, लुगडे, बंगाली पायजमा ही वस्त्रे घालतात. या लोकांच्या आहारात तांदूळ, गहू, बाजरी, या धान्यापासून बनविलेली भाकर, भात, भाजी, पोळी, दूध, तूप, लोणी, तसेच मांस, फळे यांचा समावेश होतो. लोक समूहाने शेती करत वावरतात. या गावातील लोकांना भजन, कीर्तन, पालखी बघणे व. गोष्टी आवडतात. या गावातील लोक, दिवाळी, पोळा, होळी, दसरा, गणेशोत्सव, नवरात्र हे सण मोठ्या उत्साहाने साजरा करतात. आणि सर्व एकत्र मिळून - मिसळून राहतात. एकमेकांच्या सुख - दुःखात सहभागी होतात.

अशाप्रकारे गळोगाव या गावातील लोकांचे लोकजीवन दिसून येते.

1) नदी, पर्वत, जंगल आहे का ?

i) नदी :-

या गावात ओढा आहे. त्या ओढ्याला पावसाळ्यात पाणी राहते. त्या ओढ्यातील पाण्याचा उपयोग बंधारे बांधून शेतीसाठी करतात. गावातील स्त्रिया ओढ्यावर कपडे धुवायला जातात. [illegible] उन्हाळ्यात तो ओढा कोरडा पडतो. हिवाळ्यात व पावसाळ्यात त्या ओढ्याचे पाणी गाई-गुरे पिण्यासाठी वापरतात. त्या ओढ्यामुळे गावातील लोकांना शेतीसाठी खूप फायदा होतो.

गावात दुधवडी नावाचा पर्वत आहे. तो पर्वत गावापासून दक्षिण दिशेस आहे. त्या पर्वतावर विविध प्रकारची झाडे आहेत. त्या पर्वताळ्यातच आदिवासी जमातीचे लोक राहतात. त्या पर्वतावर हनुमानाचे एक मंदिर आहे. त्या पर्वतावर हनुमान जयंतीच्या दिवशी लोक मंदिरात कार्यक्रम करतात. हा पर्वत गावापासून 1½ किलोमीटर अंतरावर आहे. या पर्वताने गावाची शोभा वाढते.

तसेच गावात भैरम बडी नावाचा पर्वत आहे. त्या पर्वतावर चीर, कडुलिंब अशाप्रकारची वृक्ष आहेत. हे पर्वत गावाच्या पूर्व दिशेला आहे. गावापासून हे पर्वत 2½ किलोमीटर इतके आहे. या पर्वताची उंची सुमारे 200 मीटर इतकी आहे. या पर्वतावर भैरम बाबा या देवाचे मंदिर आहे. या देवला लोक खूप मानतात. असे म्हटले जाते की या देवापाशी मागितलेली मनोकामना पूर्ण होते असा येथील लोकांचा विश्वास आहे. पर्यावरणीय दृष्टिने हा पर्वत पाहण्यासारखा आहे.

Topic

5] औद्योगिक क्षेत्र आहे का ?

नाही, गावात कोणतेही औद्योगिक क्षेत्र नाही.

6] कारखाने उत्पादन होते

गावात कोणतेही औद्योगिक क्षेत्र नाही म्हणून तिथे कारखानेही उत्पादन होत नाही.

१] गावात प्रदूषण आहे का?

" सर्वसामान्यपणे असा म्हणता येईल की, कोणत्याही वस्तूचे वा पदार्थाचे दूषितीकरण म्हणजे प्रदूषण होय "

मानवी कृतीमुळे आपल्या जीवतालच्या परिस्थितीत पूर्णपणे किंवा काही प्रमाणात झालेले फेरफार म्हणजे प्रदूषण होय.

गावात वायुप्रदूषण, जलप्रदूषण तसेच ध्वनीप्रदूषण आढळून येते.

1) हवेतील धनपदार्थ उदा.- धूळ व धूर मोठ्या प्रमाणात वातावरणात मिसळल्यामुळे श्वसप्रदूषण होते.

2) गावातील सांडपाणी, केरकचरा, कपडे, भांडी धुतल्यामुळे जलप्रदूषण होते.

3] गावात सार्वजनिक कार्यक्रम झाल्यास रेडिओ, लाऊड-स्पीकर मुळे गावात ध्वनीप्रदूषण दिसून येते.



गावाच्या परिसरात झाडे लावणे

Page No. 15

Date

8) वृक्षांची लागवड केली आहे का ?

गडेगांव या गावात भरपूर प्रमाणात वृक्षांची लागवड केली आहे. ग्रामपंचायत मार्फत राबविल्या जाणाऱ्या अनेक योजनेद्वारे गावातल्या रस्त्यांच्या दोन्ही बाजूंनी विविध वृक्षांची लागवड केली आहे.

या गावात कडुलिंब, चिंच, बाभूळ, व तसेच गावाचे सौन्दर्य वाढविण्यासाठी विविध फुलझाडांची लागवड केली आहे.

ग्रामपंचायत मधील काम करणारे कामगार त्या झाडांची योग्य निगा राखतात त्या झाडाला रोज पाणी घालतात. झाडांना गुरे-ढोरे यांनी खाऊ नये म्हणून झाडाभोवती कुंपण केले जाते.

अशाप्रकारे या गावात वृक्षांची लागवड केली जाते.

प्र] प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना केली आहे का? स्वच्छतागृहाच्या, कचराकुंडी आणि प्रदूषणमुक्त गाव आहे का?

* ① होय, गावातील लोकांनी प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत.

① हवा प्रदूषणाकरिता उपाययोजना :-

① वृक्ष लागवड :-


वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणावर केल्यास कार्बन-डायऑक्साइड सारखे विषारी वायू वनस्पती शोषून घेतात. झाडांची पाने -फांद्यामुळे प्रदूषित कण अडविले जातात. म्हणून झाडांना प्रदूषकांची गाळणी असेही म्हणतात.

2] आधुनिक इंधनाचा वापर :-

वाहनांमुळे शहरात प्रदूषणाच्या भयानक समस्या निर्माण होतात. घरगुती स्वयंपाककरिता लाकडे, कोळसा, गोवऱ्या वापरण्याऐवजी स्वयंपाक गॅस, सौरचूल, बायोगॅस यांचा वापर केल्यास प्रदूषण टळू शकेल.



सांडपाणी सोडल्यामुळे होणारे प्रदूषण



खाणीच्या कामामुळे
होणारे हवाप्रदूषण

## 2] जलप्रदूषणाविषयी उपाययोजना :-

① गावात जलप्रदूषण होऊ नये म्हणून गावातील सांडपाणी नाल्याद्वारे दूरच्या भागाने बाहेर काढले जाते.

2] विहिरीतील पाण्यावर ब्लिचिंग पावडर टाकली जाते.

3] गावातील टाकी स्वच्छ केल्या जाते.

4] गावात घरोघरी नळ व्यवस्था केली जाते.

## 3] ध्वनी प्रदूषणाविषयी उपाययोजना :-

1] गावातील सार्वजनिक कार्यक्रमात लावलेल्या लाऊड-स्पीकरचा आवाज कमी केला जातो.

2) योग्य कार्यक्रमातच गावात आवाज वाजविले जातात.

9) ग्रामीण स्वच्छता फवारणी केली जाते का ?

i) ग्रामपंचायत कामगारांकडून गावातील सर्व नाल्या स्वच्छ केल्या जातात.

ii) गावात मच्छर, किंवा डांस, व त्याच्यामुळे डेंग्यु, मलेरिया यांसारखे कोणतेही रोग होऊ नये म्हणून फवारणी केली जाते.

iii) गावातील लोकांना पिण्याचे पाणी शुद्ध व स्वच्छ मिळावे म्हणून पाण्यात क्लिरिंग पावडर टाकल्या जाते.

Max. Retail Price Rs.2/- Including all taxes

Page No.
Date

# गावातील लोकांचे व्यवसायजीवन




मध गोळा करणे



विहिरीतुन पाणी काढणे.



लाकुड गोळा करणे



रबराचा चीक मिळवणे



गंवडीकाम



डिंक गोळा करणे

Max. Retail Price Rs 2/- Including all taxes

# पर्यावरणीय समस्या

जगातील सर्वाधिक जागृत सहा भूकंप प्रवण क्षेत्रातील मुख्य क्षेत्र भारताच्या या प्राकृतिक विभागात आहे. वाऱ्याचवेळा भूकंप पूर आणि ज्वालामुखी हे सर्व संयुक्तपणे घडते. कधी कधी खूप काळ-चालणाऱ्या पावसामुळे नदीच्या प्रवाहात अडथळा निर्माण होतो. नदीतील हा अडथळा जेव्हा एकदम फुटतो. तेव्हा प्रवाहाच्या दिशेने राहणाऱ्या संकट येतो. भारताच्या पर्वतीय प्रदेशात हिमालयासहित सर्व ठिकाणी येणारी नैसर्गिक आपत्ती आहे. गुरे चारणे व इंधनासाठी लाकूड गोळा करणे यामुळे झाडांच्या जवळील जंगल संपत्तीचा ऱ्हास होत आहे.

उत्तर व पूर्व भारतात पाणी पुरवठा करणारा मुख्य स्रोत असलेल्या उच्च हिमालयातील हिमनद्यांच्या भाग दिवसेंदिवस कमी कमी होत आहे. जगातील नद्यांचे पाणी जास्त होत नसून ते फार कमी प्रमाणात होत आहे. "पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवताली पसरलेले वातावरण होय." मानव व पर्यावरण संबंध अत्यंत महत्त्वपूर्ण आहे."

" झाड लावा, पर्यावरण वाचवा "

## लोकसंख्या :-

पर्यावरणाचा ऱ्हास होण्यामागे महत्त्वाचे कारण म्हणजे वाढती लोकसंख्या होय. जागतिक लोकसंख्या फार झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे लोकसंख्या वाढीचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण आहे. जगामध्ये लोकसंख्या विकसनशील व अविकसनशील देशामध्ये भिन्न समस्या निर्माण झाली. औद्योगिकीकरणानंतर लोकसंख्येच्या वाढीचा वेग अत्यंत झपाट्याने वाढत आहे. इ. स 1700 मध्ये जगाची लोकसंख्या सुमारे 70 कोटी होती. ती इ. स 1900 मध्ये 166 कोटीपर्यंत पोहचली. 1970 ते 2000 या 30 वर्षांत जगाची लोकसंख्या वाढीचा वेग किती झपाट्याने वाढत गेली हे लक्षात येते. आज जगाची लोकसंख्या दरवर्षाला 9 कोटीने वाढत आहे. दर सेकंदाला जगात सरासरी 2.8 माणसाची भर पडते. याच वेगाने लोकसंख्या वाढत गेल्यास 2025 मध्ये जगाची लोकसंख्या 800 कोटीपेक्षा अधिक असेल तर 2050 मध्ये 900 कोटी पेक्षा जास्त असेल. निरनिराळ्या देशातील लोकसंख्या वाढीचा दर जागतिक सर्वच राष्ट्रामध्ये सारख्या नसून त्यात खूपच तफावत आहे. जन्म आणि मृत्यू हे जागतिक लोकसंख्या वाढीचे प्रमुख घटक आहे. जागतिक लोकसंख्यामध्ये फार बदल

झाला आहे. जन्मदरात फारसा बदल झालेला दिसून येत नाही. मात्र मृत्यूदरात झपाट्याने घट झालेली दिसून येते. त्यामुळे लोकसंख्या वाढत आहे. लोकसंख्या वाढीच्या कारणामध्ये अनेक कारणे महत्त्वाची असतात.

लोकसंख्या वाढीची अनेक कारणे आहेत ते पुढीलप्रमाणे :-

1] मृत्यूदर कमी असणे
2] जन्मदरात वाढ होणे

पूर्वी जगामध्ये मृत्यूदर फार मोठ्या प्रमाणात होता. कारण विविध साथीचे रोग नैसर्गिक आपत्ती. यामुळे सुद्धा मृत्यूदर जास्त होता. 20 व्या शतकाच्या सुरुवातीपासून वैद्यकीय सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. त्यामुळे साथीच्या रोगांमध्ये बळी पडणाऱ्यांची संख्या कमी झाली वाहतूक दळणवळणाच्या सोईमुळे होणाऱ्या जिवीत हानीस प्रतिबंध करता आला. सुधारित शेतीचे ज्ञान. खते किटकनाशके जलसिंचन यांच्या वाढत्या वापरामुळे अन्न धान्याचे उत्पादन वाढून भूक बळींची संख्या कमी झाली. तसेच आहाराच्या सकसतेचे शिक्षण यासारख्या योजनामुळे अज्ञान व अंधश्रद्धा दूर होण्यास मदत झाली.

वरील सर्व कारणामुळे जगाच्या विविध भागात मृत्यूदरात घट झाली आहे. थोडक्यात जगामध्ये मृत्यूदर कमी झाल्यामुळे लोकसंख्या झपाट्याने वाढू लागली. जन्मदर जास्त असणे यामागील दोन कारणे आहेत.

1] विवाहाचे वय कमी असणे.

2] अज्ञान, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा.

सार्वभौम विश्वास जागतिक लोकसंख्या वाढीचा वेग इ.स 1650 पर्यंत अतिशय नगण्य असा होता. इ.स 2001 मध्ये जगाची लोकसंख्या फक्त 25 कोटी होती. इ.स 1300 मध्ये जगाची लोकसंख्या 40 कोटी इतकी होती. म्हणजेच 1300 वर्षांच्या कालावधीत जगाची लोकसंख्या फक्त 15 कोटीने वाढली. इ.स 1650 मध्ये जगाची लोकसंख्या फक्त 10 कोटी वाढलेली होती. या काळात मानवी जिवनावर पूर्णपणे नैसर्गिक घटकांचे नियंत्रण होते. युद्ध, दुष्काळ, महापूर, चक्रीवादळे, रोगराई, भूकंप इत्यादी अन्य इतर गोष्टी इ. मुळे लोकसंख्या थोडी कमी होते.

## शेती :-

काही भागातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. कापूस, ऊस आणि भात ही प्रमुख पिके आहेत. नद्यांच्या काठी पारंपारिक पद्धतीची शेती आढळते. पण अलीकडे व्यापारी आणि सहकारी शेतीला शासनाने उत्तेजन दिले आहे. गहू, तांदुळ, मका, ज्वारी, तेलबिया, कापूस, चहा, कॉफी, तंबाखू इत्यादी पिके येथे होतात. शेतीला लागणारा पाणी पुरवठा नदी व तिच्यातून काढलेल्या कालव्यातून होत असल्यामुळे शेती व्यवसाय प्रामुख्याने नदीच्या काठी व त्रिभुज प्रदेशातून चालतो.

मध्यवर्ती मैदानातील सुपीक मृदा आणि आधुनिक तंत्रज्ञान याच्या सहाय्याने मानवाने प्रस्थापित आहे. त्यामुळे शेती व्यवसाय भरभराटीस आला आहे. नवीन शेती - पद्धती यामुळे शेती उत्पादनात अग्रेसर होत आहे.

## पर्वत :-

पर्वतीय रांगा सुमारे 3400 मी. उंची वर सुरू होतात. टेकड्या, दऱ्या, पर्वत, रांगा हे सर्व उंच भागावर असतात. पर्वतावर अनेक प्रकारचे वृक्ष असतात. त्या पर्वतावर अनेक प्रकारचे वृक्ष व जनावरे सुद्धा असतात.

खनिजसंपत्ती :-

येथील नाजूक पर्यावरण, दुर्गमता आणि आवश्यक पायाभूत सुविधांच्या अभावामुळे प्रदेशातील खनिजांचा पूर्णपणे शोध घेता येत नाही. तरीदेखील नैसर्गिक वायू, पेट्रोलियम आणि चुनखडी हे शोध वेगवेगळ्या ठिकाणी घोतले गेले आहे. चुनखडक आणि कोळसा या खनिजांचे साठे मेघालयात मोठ्या प्रमाणात आहेत. गंधकाचा चांगली नाही.

पिके :-

ज्वारी, ऊस, कापूस व तेलबिया ही देशाच्या इतर भागांतून पिकवली जाणारी नगदी पिके या प्रदेशात फारशी घेतली जात नाहीत. त्याऐवजी मळ्याची शेती, फळउत्पादन, रेशीम उत्पादन येथे जास्त प्रसिद्ध आहेत
उदा : चहा, अननस, मलबेरी, संत्री, मोसंबी सुपारी

नद्या :-

हिमालयातील बहुतांश नद्या बारमाही आहेत. पावसाळ्यात पर्जन्यामुळे आणि उन्हाळ्यात वितळणाऱ्या बर्फामुळे त्यांना पाणीपुरवठा होतो.

प्रदूषण :-

प्रदूषण अनेक प्रकारचे असतात. सर्व सामान्यपणे असे म्हणता येईल की "कोणत्याही वस्तूचे वा पदार्थाचे दुषीतीकरण म्हणजे प्रदूषण होय." हवाप्रदूषण, जलप्रदूषण, वायुप्रदूषण, ध्वनीप्रदूषण हे सर्व प्रदूषणाचे प्रकार आहेत. मानवाच्या मूलभूत गरजांमध्ये हवे नंतरचे पाण्याला हे महत्त्व आहे. "अनेक प्रदूषणाच्या सान्निध्याने जेव्हा पिण्यायोग्य पाणी दुषीत होते. त्याला जलप्रदूषण असे म्हणतात." पृथ्वीच्या सुमारे 70.80% भाग पाण्याने व्यापलेला आहे. मानव आपल्या गरजा भागवण्यासाठी त्या कृती करत असतो. त्यातून अनेक प्रकारचा कचरा निर्माण होत असतो. त्यातून अनेक प्रकारचा कचरा निर्माण होत असतो. अशा कचऱ्यापासून प्रदूषण होते. महासागरीय प्रदूषण ही एक मोठी समस्या यातून निर्माण झाली आहे.

कारखान्यातील विषारीवायू वाऱ्याबरोबर ज्यादिशेने जातात त्याभागात घरे व कोणाला ही आता वसाहतीला परवानगी देऊ नये. मूळ वस्तीवर नागरिकरणामुळे वाढल्या तर कारखाने वस्तीपासून दूर हलवावे. हवा व असी पाणी प्रदूषण इतकेच पर्यावरणात ध्वनी प्रदूषणही गंभीर समस्या आहे. माणसाची कर्णप्रिये विशेष

क्षमतेपर्यंत हवेचा आवाज सहन करू शकतात. ज्या क्षमतेपेक्षा मोठा ध्वनी कानात पडतो तेव्हा ध्वनी प्रदूषण निर्माण होते. ध्वनी प्रदूषणाची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

1] नैसर्गिक ध्वनी प्रदूषण
2] सजीवांचे आवाज
3] कृत्रिम वस्तूंचे आवाज

मू. प्रभावशील धूर आणि धूळ मोठ्या प्रमाणात वातावरणात मिसळतात. लाकूड व कोळसा जाळल्यानंतर मोठे काही वातावरणात मिसळतात. रासायनिक प्रक्रियेमुळे विषारी फेस तयार होऊन वातावरणात तरंगतात. या सर्व प्रदूषणाच्या संयोगाने धुळीचे ढग तयार होऊन हवा प्रदूषित होते. याचा परिणाम वृक्षावर होऊन पाऊस कमी पडतो. आपल्याला काही त्यावर उपाय करता येईल. ते पुढीलप्रमाणे

1] परिवहन यंत्रणा
2] नियमांचे कठोर पालन
3] आरोग्याविषयक जागृती
4] वृक्ष लागवड
5] आधुनिक इंधनाचा वापर इ. उपाय प्रसभा. करता येईल.

वृक्षतोडणी :- आणि वृक्षतोड मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड व त्यातून होणारा वृक्ष वेगाचा नाश ही पृथ्वीची प्रमुख समस्या आहे. शेती करण्यासाठी, वसाहतीसाठी तसेच जाळण्यासाठी लाकडतोड केली जाते. यामुळे वनाखालील क्षेत्र दिवसेंदिवस कमी होऊ लागले आहे.

उदा. विषुववृत्तीय सदाहरित वनांचा तेथील वनीकरण करण्यासाठी "झाडे लावा, झाडे जगवा" ही मोहिम तसेच पुनर्वनीकरण यासारखे उपाय योजले आहे.

मानव व इतर प्राण्यासाठी वनस्पतीची नितांत गरज असते. वनस्पती हे महत्त्वाचे उत्पादक घटक आहे. गवत, वेली, झाडे-झुडपे मोठे वृक्ष अशा निरनिराळ्या वनस्पती पृथ्वीवर आढळतात. भूतलावर मानवसहित सर्व सजीवांच्या दृष्टीने नैसर्गिक वनस्पतीच्या विपुल स्वरूपात होणे. जंगलामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पतीचे समूह रचना असतात. त्याच वनस्पती असे आढळते. लाकूड कटाईमुळे जंगलाचा मोठ्या प्रमाणावर नाश होतो. त्याचे विपरीत परिणाम जंगली पशु-प्राणी व वनवासी जमातींच्या जीवन प्रमाणावर होतो. लाकूड कटाईमुळे जंगलांचा दर नाश होत आहे. याबरोबर पर्यावरणाचाही समतोल बिघडत आहे.

# Appendix II

V.S.P.M. Academy of Higher Education, Nagpur

# Mahatma Gandhi Arts & Commerce College, Parseoni, Dist. Nagpur 441105

(NAAC Accredited)

## CERTIFICATE OF COMPLETION

This is to certify that **Miss. Pallavi Banduji Shende** has submitted the Survey report title **"Sahitya Shastra - I" ( साहित्य शास्त्र - I)"**, towards partial fulfillment of MA Marathi degree. This Survey Report has not been submitted for any other examination and does not form part of any other course undergone by the candidate.

It is further certified that he has ingeniously completed his Survey as prescribed by Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur.

Place: Parseoni

Date : 14/04/2023

Guide

Dr. Rakesh D. Kabhe

HOD. Dept. of Marathi

PRINCIPAL

M. G. Arts & Commerce College

Parseoni, Dist. Nagpur

Scanned with OKEN Scanner

V.S.P.M. Academy of Higher Education, Nagpur

**Mahatma Gandhi Arts & Commerce College,**

**Parseoni, Dist. Nagpur 441105**

(NAAC Accredited)

## CERTIFICATE OF COMPLETION

This is to certify that **Miss. Payal Nanu Diyewar** has submitted the Survey report title **"Environment Studies" (पर्यावरण शास्त्र)"**, towards partial fulfillment of MA Economics degree. This Survey Report has not been submitted for any other examination and does not form part of any other course undergone by the candidate.

It is further certified that he has ingeniously completed his Survey as prescribed by Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur.

Place: Parseoni

Date : 04/04/2023

Guide

Dr. Lokchand B. Jadhao

HOD. Dept. of Economics

PRINCIPAL

M. G. Arts & Commerce College

Parseoni, Dist. Nagpur

Scanned with OKEN Scanner

V.S.P.M. Academy of Higher Education, Nagpur

**Mahatma Gandhi Arts & Commerce College,**

**Parseoni, Dist. Nagpur 441105**

(NAAC Accredited)

## CERTIFICATE OF COMPLETION

This is to certify that **Miss. Mayuri Laxman Wazade** has submitted the Survey report title **"Environmental Studies"**, towards partial fulfillment of MA Economics degree. This Survey Report has not been submitted for any other examination and does not form part of any other course undergone by the candidate.

It is further certified that he has ingeniously completed his Survey as prescribed by Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur.

Place: Parseoni

Date : 14/04/2023

Guide

Dr. Lokchand B. Jadhao

HOD. Dept. of Economics

PRINCIPAL

M. G. Arts & Commerce College

Parseoni, Dist. Nagpur

Scanned with OKEN Scanner

V.S.P.M. Academy of Higher Education, Nagpur

**Mahatma Gandhi Arts & Commerce College,**

**Parseoni, Dist. Nagpur 441105**

(NAAC Accredited)

# CERTIFICATE OF COMPLETION

This is to certify that **Mr. Nikesh Babulal Dhurve** has submitted the Survey report title **"Report on pollution in Palora village " पालोरा गावातील प्रदूषण संबधित अहवाल"**, towards partial fulfillment of MA Sociology degree. This Survey Report has not been submitted for any other examination and does not form part of any other course undergone by the candidate.

It is further certified that he has ingeniously completed his Survey as prescribed by Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur.

Parseoni, Dist. Nagpur

Date : 06/04/2023

(Dr. D.T. Shende)

Guide

Dr. Dnyaneshwar T. Shende

HOD. Of Sociology

PRINCIPAL

M. G. Arts & Commerce College

Parseoni, Dist. Nagpur

Scanned with OKEN Scanner

V.S.P.M. Academy of Higher Education, Nagpur

# Mahatma Gandhi Arts & Commerce College, Parseoni, Dist. Nagpur 441105

(NAAC Accredited)

## CERTIFICATE OF COMPLETION

This is to certify that **Miss. Ashwini Shantaram BAwankule** has submitted the Survey report title **"History of Marathi Literature" (अर्वाचीन मराठी वाड्मयचा इतिहास)**", towards partial fulfillment of MA Marathi degree. This Survey Report has not been submitted for any other examination and does not form part of any other course undergone by the candidate.

It is further certified that he has ingeniously completed his Survey as prescribed by Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur.

Parseoni, Dist. Nagpur

Date : 14/04/2023

Guide

Prof. Vijaya Wankhede

Assistant Prof

Dept. of Marathi

PRINCIPAL

M. G. Arts & Commerce College

Parseoni, Dist. Nagpur

Scanned with OKEN Scanner

Bright Accounting Solution

Office Address,
Plot No. 4, Shri Prabhu Apartments, Gorewada Road , Nagpur. 440013.
Ph. No:- 8888896197; Email : brightsolution2002@gmail.com

To,
The Principal
MG College Parseoni
Dist. Nagpur

Subject : For the information of the student to attend the interview for the internship at our company.

Respected Sir,

It is to inform you that our company going to appoint intern for the work of accountancy, income tax and audit. It is request you to please send the eligible students for the interview process.

Thank you.

Date of interview : 04/01/2023

Address : Plot No. 4, Shri Prabhu Apartments, Gorewada Road , Nagpur. 440013.

BRIGHT ACCOUNTING SOLUTION NAGPUR ★

Hiteshwari

Proprietor
BRIGHT ACCOUNTING SOLUTION
NAGPUR

Bright Accounting SOLUTION

Office Address,
Plot No. 4, Shri Prabhu Apartments, Gorewada Road, Nagpur. 440013.
Ph. No:- 8888896197; Email : brightsolution2002@gmail.com

To,
The Principal
MG College Parseoni
Dist. Nagpur

Subject : List of candidate selected for internship.

Respected Sir,

It is to inform you that our company appoint 12 interns for the work of accountancy, income tax and audit at our company for the period of 1 year. The list of selected candidate are given below

| Sr.No | Name of Candidate |
|---|---|
| 01 | Sejal Banduji Bawankule |
| 02 | Ritik Dhanraj Khandar |
| 03 | Gaurav Kishor Virkhede |
| 04 | Krunal Premchand Meshram |
| 05 | Hemant Sukhadeo Nistane |
| 06 | Akanksha Arun Wasnik |
| 07 | Rajni Vitthal Raut |
| 08 | Vaibhav Krushna Deotale |
| 09 | Nikhil Prakash Kekatpure |
| 10 | Khushal Dnyaneshwar Kumbhalkar |
| 11 | Bhavana Dhanalal Chouriwar |
| 12 | Snehal Hemraj Narnaware |

Thank you for your support, hope for the same in future.

Jiteshwari

Proprietor

BRIGHT ACCOUNTING SOLUTION NAGPUR

BRIGHT ACCOUNTING SOLUTION NAGPUR

**SAI ACCOUNTING SERVICES**
Complete Accounting Solution

Sachin M. Mishra
saiaccountingservices@gmail.com

To,
The Principal
Mahatma Gandhi Art's & Commerce College
Parseoni, Dist. Nagpur.

Sub : Regarding list of candidate suitable for Internship in field of Account and Taxation.
Ref.. MOU Dated. 01.01.2020.

Respected Sir,

With reference to subject above and for your kind information that we are going to hire 10 interns having good knowledge in the field of accounting and taxation, for which we are arrange interviews for the same. It is request you to send the list student for the above interview, also send student on date and address given below.

Wanting positive support from you.

Thank you.

Date of Interview : 08/09/2022
Address : At Block No.21, Mangalwari Complex, Sadar bazar Nagpur. 440001

Mr. Sachin M. Mishra

Sai Accounting Services
NAGPUR

Sai Accounting Services
Nagpur.
Date: 01/09/2022

**SAI ACCOUNTING SERVICES**
Complete Accounting Solution

**Sachin M. Mishra**
saiaccountingservices@gmail.com

To,
The Principal
Mahatma Gandhi Art's & Commerce College
Parseoni, Dist. Nagpur.

Sub : List of candidate selected for Internship.
Ref.. MOU Dated. 01.01.2020.

Respected Sir,

With reference to subject and for your kind information that our institute conduct the interview on 08/09/2022 of the student as per list given by you of which 10 student are selected by our interviewer as listed below for the internship for accounting and taxation work at our institute.

**List of Student Selected for Internship**

01 Akanksha Rajendra Dhurve
02 Dinesh Moreshwar Kawade
03 Nitesh Arun Tarare
04 Abhishek Harising Bagmare
05 Runal Onkar Dhanole
06 Kajal Dhanraj Gaykwad
07 Rohit Devidas Chouriwar
08 Saurabh Hemraj Hedau
09 Dipak Sukhdeorao Wankhede
10 Rupesh Dhanraj Yerkhede

We are very thankful for your kind support.

SAI ACCOUNTING SERVICES NAGPUR

Mr. Sachin M. Mishra
Sai Accounting Services
NAGPUR
Sai Accounting Services
Nagpur.
Date: 11/09/2022

N.K.P. Salve Institute of Medical Sciences & Research Centre and
Lata Mangeshkar Hospital
Digdoh Hills, Hingna Road, Nagpur - 440019
Phone (07104) 665000, 244291, Fax : (07104) 306111 mail : nkpsims1@rediffmail.com / website : www.nkpsims.in

19.10.2022

# Certificate

This is to certify that the first year B.Com students of Mahatma Gandhi Arts & Commerce College, Parseoni, Dist. Nagpur visited our campus for undergoing the training of 'First Aid'.

They were shown a practical demonstration in this regard and also explained regarding the 'Dos and Don'ts' to bear in mind in such situations. They were guided by the Faculty and Nursing staff of our institution.

**(Dr. Kajal Mitra)**
**Dean**

DEAN
N.K.P. Salve Institute
Of Med. Sciences & RC
and LMH, NAGPUR

N.K.P. Salve Institute of Medical Sciences & Research Centre and
Lata Mangeshkar Hospital
Digdoh Hills, Hingna Road, Nagpur - 440019
Phone (07104) 665000, 244291, Fax : (07104) 306111 mail : nkpsims1@rediffmail.com / website : www.nkpsims.in

19.10.2022

# Certificate

This is to certify that the first year B.Com students of Mahatma Gandhi Arts & Commerce College, Parseoni, Dist. Nagpur visited our campus for undergoing the training of 'First Aid'.

They were shown a practical demonstration in this regard and also explained regarding the 'Dos and Don'ts' to bear in mind in such situations. They were guided by the Faculty and Nursing staff of our institution.

**(Dr. Kajal Mitra)**
**Dean**

VSPM ACADEMY OF Higher Education Nagpur

MAHATMA GANDHI ARTS AND COMMERCE COLLEGE, PARSEONI DIST.NAGPUR

LIST OF STUDENT PARTICIPANT

NAME OF PROGRAMME : FIRST AID TRAINING PROGRAMME AT NKP SALVE INSTITUTE OF MEDICAL SCIENCE AND RESERCH CENTER.

DATE OF TRAINING : 02/10/2022 TO 08/10/2022

| **Name of Student** | **Student Signature** |
|---|---|
| 1. Achal Digambar Gajbhiye | |
| 2. Akansha Arun Wasnik | A. Wasnik |
| 3. Bhushan Manikrao Dhage | B. Dhage |
| 4. Ishika Bhaurao Sahare | I. Sahare |
| 5. Kajal Dhanrajji Gaikwad | K. Gaikwad |
| 6. Khushal Dnyaneshwar Kumbhalkar | K. Kumbhalkar |
| 7. Rajesh Moreshwar Wanjari | R. Wanjari |
| 8. Sakshi Bhujang Lohakare | S. Lohakare |
| 9. Sandhya Shantaram Mangrulkar | S. Mangrulkar |
| 10. Harshali Radhesham Chaudhari | |
| 11. Shweta Sudhakar Wankhede | S. Wankhede |
| 12. Vaishnavi Vijayji Lohakare | V. Lohakare |

IQAC COORDINATOR
Mahatma Gandhi Arts & Commerce College
Parseoni Dist. Nagpur

MAHATMA GANDHI COLLEGE, PARSEONI, Dist. NAGPUR

PRINCIPAL
Mahatma Gandhi Arts
Commerce College,
Parseoni, Dist. Nagpur